**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत जगन्नाथ माळकर
शिवम स्वप्नसागर हौ.सो.प्लॉट नं.११७, सेक्टर नं.११,
पंचवटी कॉम्प्लेक्सनजीक(प), धनकवडी-चव्हाणनगर रोड,
चव्हाणनगर (पद्मावती), पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,
सोमवार पेठ, गंजी गल्ली, हत्तीमहल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपरिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर मार्केट, सिध्देश्वर चौक,
तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७६+२३४४+२३४५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत जगन्नाथ माळकर
शिवम स्वप्नसागर हौ.सो.प्लॉट नं.११७, सेक्टर नं.११,
पंचवटी कॉम्प्लेक्सनजीक(प), धनकवडी-चव्हाणनगर रोड,
चव्हाणनगर (पद्मावती), पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,
सोमवार पेठ, गंजी गल्ली, हत्तीमहल, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.एच.एस.नांगदेपाटील

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
नगरपरिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर मार्केट, सिध्देश्वर चौक,
तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली श्री.आर.जे.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.९.२००७ (अ.क्र.२०७६)<br>दि. १९.१०.२००७<br>दि. २९.१.२००८ (अ.क्र.२३४४)<br>दि. १२.९.२००८ (अ.क्र.२३४५) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१०.२००७ (अ.क्र.२०७६)<br>दि. १२.११.२००७<br>दि. २१.४.२००८ (अ.क्र.२३४४)<br>दि. १६.६.२००८ (अ.क्र.२३४५) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.१२.२००७ (अ.क्र.२०७६)<br>दि. २२.५.२००८ (अ.क्र.२३४४)<br>दि. १९.६.२००८ (अ.क्र.२३४५) |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००८ (अ.क्र.२०७६)<br>अ.क्र.२३४४ व २३४५ मध्ये निर्णय दिलेला नाही. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१६.१२.२००८ रोजी (अपील क्र.२०७६) आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१०.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपंग शिक्षण सेवकांच्या बदल्यांसंदर्भात शासकीय निर्णय नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले, ते पटत नाही. सौ.प्रभावती वसंत माळकर यांची वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर होऊनही दिली जात नाही. वेगवेगळ्या प्रकारची माहिती आपण पाच अर्जांद्वारे मागितली असून जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, सोमवार पेठ, गंजी गल्ली, हत्तीमहल, जि.कोल्हापूर हे चुकीची माहिती देतात, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वसंत जगन्नाथ माळकर यांनी केली.

श्री.माळकर त्यांच्या पत्नीच्या संदर्भातील मागणीच्या अनुषंगाने सातत्याने पत्रव्यवहार, तक्रारी व अर्ज करीत असतात. या एकाच विषयाबाबत त्यांनी अनेक अर्ज केले असून वेळोवेळी त्यांना उत्तरे देण्यात आली आहेत. याच संदर्भातील अ.क्र.२०७३, २०७४ व २०७५ यांची सुनावणी पूर्वी झाली असून आयोगाने त्याबाबत निर्णय दिला आहे. विशिष्ट तक्त्यामध्येच माहिती मिळावी, प्रशासकीय कार्यवाहीतील त्यांना वाटणाऱ्या त्रुटी दूर कराव्यात असा त्यांचा आग्रह असून त्याबाबत वेळोवेळी त्यांना उत्तरे व स्पष्टीकरण देण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर मार्केट, सिध्देश्वर चौक, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली श्री.आर.जे.शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, सोमवार पेठ, गंजी गल्ली, हत्तीमहल, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.एच.एस.नांगदे पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

वारंवार त्याच विषयावर त्याच स्वरूपाचे अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व क्रयशक्ती यांचा अपव्यय करू नये, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

श्री.माळकर यांचे अ.क्र.२३४४ वरील विषयावरीलच असून, त्याच मागण्या व त्याच स्वरूपाची प्रशासकीय कार्यवाहीची मागणी त्यांनी केली आहे.

अपील क्र.२३४५ मध्ये श्री.माळकर यानी सेवानिवृत्तांच्या संदर्भातील माहिती मागितली असून स्वतःच्या व स्वतःच्या पत्नीच्या सेवानिवृत्तीवेतनासंबंधित नकला मागितल्या आहेत.

त्याबाबतही जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शिक्षण मंडळ, सिध्देश्वर मार्केट, सिध्देश्वर चौक, तासगाव, ता.तासगाव, जि.सांगली यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. श्री.माळकर यांनी अर्जात मुख्यत: भाष्य केले असून, माहितीची मागणी नेमकी नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी याबाबत योग्य कार्यवाही केली आहे, असे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे

28 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. भास्कर विठ्ठल करमरकर
मधुबन अपार्टमेंट, अ/१५,
समर्थ पथ, कर्वेनगर, पुणे-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.सं.) पुणे १ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.सं.) पुणे १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १०.३.२०१० |

७ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.सं.) पुणे १ श्री. शं.बा. पन्हाळ

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक अभियंता,
यांत्रिकी मंडळ (उ.सं.) पुणे १ श्री. चं. रा. बासवाडेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९५५ ते १९६२ या कालावधीतील आपल्या सेवेच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. भास्कर विठ्ठल करमरकर यांनी माहिती मागितली होती. त्यांचे सेवापुस्तक उपलब्ध होत नसल्यामुळे सेवा पुस्तकाशी संबंधित माहिती देता येत नसल्याचे त्यांना वेळोवेळी कळविले आहे. यांत्रिकी मंडळातील त्यांच्या सेवेचे प्रमाणपत्र त्यांना देण्यात आले आहे. परंतु दि.२६.४.१९५५ ते २६.४.१९५९ या काळात मंडळात ते सेवेला नसल्यामुळे तसे प्रमाणपत्र दिले नाही व त्याचीच मागणी ते करीत आहेत. यांत्रिकी मंडळ कार्यालय १९५९ साली स्थापन झाले आहे. श्री. करमरकर यांनी दिलेला सेवेचा तपशील पाहता वरील कालावधीत ते अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांच्या अधिनस्त सेवेत असल्याचे दिसते. त्यामुळे त्या कालावधीचे प्रमाणपत्र त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. तसे त्यांना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला कळविले आहे, असे तपशीलवार लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे श्री. च. रा. बासवाडेकर व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे श्री. शं. बा. पन्हाळ यांनी केले. हे लक्षात घेता त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. श्री. भास्कर विठ्ठल करमरकर यांच्या सेवाकालाबाबतच्या तपशीलाची तपासणी करुन प्रमाणपत्र स्वरुपातील त्यांना आवश्यक असलेली माहिती अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांनी दि. १५.५.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास देऊन अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**प्रत :** अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-१ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सु. वि. देशमुख
सहा. आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,
पुणे- ४११ ०१८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,
पुणे- ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,
पुणे- ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा शहर अभियंता,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,<br>पुणे- ४११ ०१८ श्री. बी. टी. बनकर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१.२००८, २२.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाची तारीख | दि. ३०.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मूळ अर्जदार श्री. पांडुरंग बाबुराव वैष्णव यांनी दाखल केलेला अर्ज व्यक्तीगत नावावर नसून संस्थेच्या नावावर असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. सु. वि. देशमुख यांनी माहिती नाकारली. परंतु त्यांना माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी दिले. त्याविरूध्द श्री. देशमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपील व्यक्तीच्या नावावर नसल्याचे सहाय्यक आयुक्त, प्रशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांचे प्रतिपादन मूळ अर्जानुसार योग्य दिसत नाही. मूळ अर्जदाराने नावासोबत संस्थेचे नाव व पद आदींचा उल्लेख केला आहे. त्यामुळे माहिती नाकारण्याची त्यांची कारणे योग्य नाहीत. सन १९८२ ते २००८ एवढ्या प्रदीर्घ कालावधीतील, विस्तृत स्वरुपातील आणि विविध विभागांकडील माहिती अभिलेख स्वरूपात उपलब्ध असेल ती अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करून देता येईल, असे सहाय्यक आयुक्त, प्रशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. सु. वि. देशमुख यांनी अपिलय प्राधिकारी यांना कळविले, ते योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक तर त्यानुसार माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 28 APR 2010

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)

राज्य माहिती आयुक्त,

पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. एकनाथ महादू वर्पे
मु. पो. मरकळ, ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
उप विभागीय कृषि अधिकारी,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २३.३.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. एकनाथ महादू वर्पे
मु. पो. मरकळ, ता. खेड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उप विभागीय कृषि अधिकारी,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे श्री. गोविंद परजणे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे श्री. चंद्रकांत भोर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मनी ऑर्डरने पाठविलेले शुल्क जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, राजगुरुनगर, ता. खेड यांनी नाकारले व माहिती मुदतीत न देता उपोषणास बसल्यानंतर दिली अशी तक्रार अपीलकर्ता श्री. एकनाथ महादू वर्पे यांनी केली.

अपीलकर्त्यास शुल्काबाबत विहित मुदतीत कळविले होते, त्यांनी व्यक्तिशः आपल्या नावे मनी ऑर्डर पाठविल्यामुळे स्वीकारली नाही. दरम्यानच्या काळात आपली बदली झाली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, राजगुरुनगर, ता. खेड श्री. विनायक देशमुख यांनी सांगितले. आपण रूजू झाल्यावर श्री. वरपे यांना पुन्हा पत्र पाठविले व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, राजगुरुनगर, ता. खेड यांच्या सूचनेप्रमाणे रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, त्याची पोहच आहे. त्यांच्या अन्य तक्रार अर्जावरही माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, राजगुरुनगर, ता. खेड, श्री. चंद्रकांत भोर यांनी केले.

वरील दोघांचेही प्रतिपादन रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, राजगुरुनगर, ता. खेड श्री. गोविंद परजणे यांनी नमूद केले. सर्व माहितीच्या प्रतींसह अपीलकर्त्याची पोहच असलेले पत्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केले.

शुल्काबाबत योग्य प्रक्रिया पार पाडलेली नसताना व जन माहिती अधिकाऱ्यांनी पत्रव्यवहार केला असताना दिशाभूल करणारी विधाने न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 27 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जयंत शंकर कुलकर्णी
२११, गणेशखिंड रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(१), पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जयंत शंकर कुलकर्णी
२११, गणेशखिंड रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर(१), पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.उत्तर नाही |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

झोपडपट्टीतील रस्तारूंदीबाधित व्यापाऱ्यांना उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार देण्यात आलेली तीन एकर जमीन बळकाविण्याचा प्रयत्न पुण्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक श्री.अनिल भोसले करीत आहेत. विस्थापित व्यावसायिकांनी स्थापन केलेल्या 'वीर चापेकर कमर्शियल प्रिमायसेस सहकारी संस्था मर्यादित,' स.नं.५/२, बाणेर, ता.हवेली, जि.पुणे या सहकारी संस्थेच्या नियमाप्रमाणे रहिवासी नसल्यामुळे ते अध्यक्ष व सभासद होऊ शकत नाहीत. परंतु सहकार कायद्यातील अधिकारी योग्य कार्यवाही न करता त्यांना सहकार्य करीत असून माहिती देत नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जयंत शंकर कुलकर्णी यांनी केली.

अपीलकर्ता यांनी उपस्थित केलेले मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तथापि त्यांचे आरोप निराधार आहेत. अभिलेखानुसार योग्य अशी सर्व माहिती त्याना देण्यात आली आहे. अन्य माहिती संस्था स्तरावरील आहे. सन २००८ सालचा लेखा तपासणी अहवाल अद्याप संस्थकडून आपल्या कार्यालयाला प्राप्त झालेला नाही. माहिती देण्याबाबत संस्थेलाही कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे श्री.विनायक कोकरे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. माहिती विलंबाने

दिली नसून प्रशासकीय कार्यवाहीला विलंब झाल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे, असे त्यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेले कार्यवाहीविषयक मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत. तथापि त्या संदर्भातील माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. संस्थेच्या मागील दहा वर्षांच्या लेखा तपासणी अहवालाच्या प्रती अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात व अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास सर्व संचिका अवलोकनार्थ उपलब्ध करून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाच्या कार्यवाहीबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एन.एम.कराळे
संत ज्ञानेश्वरनगर (कराळे चाळ),
जुन्या पोस्टऑफीसजवळ, भोसरी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी,
औरंगाबाद विभाग, क्रांती चौक, जालना रोड, औरंगाबाद — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
औरंगाबाद विभाग, क्रांती चौक, जालना रोड, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एन.एम.कराळे
संत ज्ञानेश्वरनगर (कराळे चाळ), जुन्या पोस्टऑफीसजवळ, भोसरी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
औरंगाबाद विभाग, क्रांती चौक, जालना रोड, औरंगाबाद प्रतिनिधी श्री.पी.व्ही.खोले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.६.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.७.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

दुग्धशाळा पर्यवेक्षक श्री.के.व्ही.देशपांडे यांची वेतननिश्चिती करून दिलेल्या फरकाच्या रकमेबाबत गेल्या तीन वर्षांपासून आपण माहिती मागत असून ती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.एन.एम.कराळे यांनी केली.

श्री.देशपांडे यांची वेतननिश्चिती केली परंतु फरकाची रक्कम दिलेली नाही. श्री.कराळे यांनी त्रयस्थ व्यक्तीची माहिती मागितली होती. तरीही शासकीय दूध योजना, नांदेड यांच्याशी संबंधित असलेली ही माहिती त्यांच्याकडून मागवून श्री.कराळे यांना उत्तर पाठविले. वेतननिश्चिती झाली, तरी श्री.देशपांडे यांना फरकाची रक्कम अदा केलेली नाही, त्यामुळे त्यांच्या पावत्या आदी माहितीचा प्रश्न येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री.पी.व्ही.खोले यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. श्री.कराळे यांना संबंधित माहिती कळविल्याचा व त्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा तपशीलवार अहवाल सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक दुग्धशाळा विकास अधिकारी,(तां), प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास

अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी दि.५.४.२०१० च्या पत्रान्वये सादर केला असून श्री.कराळे यांना दि.३.४.२०१० च्या पत्रान्वये पुन्हा त्याबाबत कळविल्याचे नमूद केले आहे. संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी सोबत जोडल्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शंकर नामदेव कड
मु.पो.चाकण, ता.खेड,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय खेड, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३५/पुणे |
| २ | सुनावणीचा दिनांक | दि. १५/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/०२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/०३/२००८ |
| ५ | **उपस्थिती**<br>श्री.शंकर नामदेव कड<br>मु.पो.चाकण, ता.खेड,<br>जि.पुणे | |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** गट क्रमांक ८६८ मधील स्मशानभूमीचा फेरफार मिळणे बाबत व गट नं.८७० मधील फळझाडांची नोंद कोणत्या निकषावर कमी करण्यात आली या बाबतचा खुलासा | |

## विवेचन

'आपणास आवश्यक असणारी माहिती मिळाली असून माझी कोणतीही तक्रार नाही त्यामुळे अपील निकाली काढण्यात यावे', असे आपण पूर्वीच लेखी नमूद केले असल्याचे अपीलकर्ता श्री. शंकर नामदेव कड यांनी सुनावणीच्या वेळी समक्ष सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 15 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.मुकुंद नामदेव सावस्कर
अी-९, सँडवीक कॉलनी, भोसरी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवनसमोर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा,
पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवनसमोर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१७० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.मुकुंद नामदेव सावस्कर
अी-९, सँडवीक कॉलनी, भोसरी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ,
नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवनसमोर, पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.७.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२७.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या एका अर्जाला मुद्देनिहाय उत्तर मिळाले नाही व माहिती मुदतीत व पूर्ण मिळाली नाही. त्यानंतरही आपण दोन अर्ज केले असून डिसेंबर १९९४ ते ऑक्टोबर २००७ या सेवाकाळातील तांत्रिक खंड, बढती याबाबतची माहिती मागितली होती. सेवापुस्तकात नोंद घेण्याची मागणी केली होती. आधी माहिती साक्षांकित करून दिली नाही. नंतर साक्षांकित करून प्रती दिल्या, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.मुकुंद नामदेव सावस्कर यांनी केली.

डॉ.सावस्कर यांच्या सेवेतील अनियमिततेबाबतचा हा विषय असून याबाबत माहितीच्या अधिकारासह वेगवेगळ्या मार्गांचा वापर करून ते आपल्या मागण्या मान्य करून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. याबाबत त्यांच्या सर्व पत्रव्यवहाराला वेळोवेळी उत्तरे दिली आहेत. दि.१३.१२.२००७च्या त्यांच्या अर्जाला दि.१०.१.२००८ रोजी उत्तर देऊन शुल्क कळविले. त्यांनी दि.२९.३.२००८ रोजी शुल्क भरल्यानंतर त्यांना त्याच दिवशी कागदपत्रांच्या छायांकित प्रती दिल्या. ना-देय प्रमाणपत्र देणे, रजेचा कर्तव्य कालावधी धरणे आदी स्वरूपाच्या त्यांच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून त्याबाबतची सद्यस्थिती त्यांना कळविण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवनसमोर, पुणे डॉ.यु.एच.गावंडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता डॉ.सावस्कर यांचे अनेक मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीबाबत आक्षेप नोंदविणारे व विविध स्वरूपाच्या मागण्या करणारे आहेत. त्याचेही स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरून करण्यात आल्याचे दिसते. मात्र या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेंटस, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक
उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.जिल्हा निबंधक वर्ग-२,
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेंटस, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक
उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्री.चिंतामणी जोशी

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सहा.जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्री.एस.अे.नारखेडे | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

शासकीय वाहनाचे लॉगबुक व संबंधित वाहन तपासणीसाठी मिळण्याची मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे केली होती. वरिष्ठांची परवानगी घेतल्याशिवाय तपासणी करू देता येणार नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिले व नंतर नोंदणी उपमहानिरीक्षकांनी 'प्रशासकीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी आहेत, ते माहिती देतील' असे सांगितले. तसेच अपीलही फेटाळले. त्यामुळे तपासणीमागील उद्देश साध्य झाला नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.रमेश दिनकर पुंडे यांनी केली.

श्री.पुंडे यांच्या अर्जाला त्याच दिवशी जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर दिले व लॉगबुक आणि वाहन तपासणीसाठी विहित मुदतीत उपलब्ध करून देण्यात येईल, असे कळविले. ही मुदत संपण्याआधीच श्री.पुंडे यांनी अपील केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांनी अपील मुदतपूर्व असल्याच्या कारणावरून फेटाळले. जन माहिती अधिकाऱ्यांनी लॉगबुक तपासणीसाठी दिलेल्या तारखेला श्री.पुंडे उपस्थित राहिले नाहीत. वाहनाची तपासणी ही माहितीच्या अधिकारात येत नाही, तरीही तयारी दर्शविली होती, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्री.चिंतामणी जोशी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्रीमती एस.आर.पाटील यांनी मुलाच्या आजारपणामुळे उपस्थित राहता येत नसल्याचे कळविले होते. त्यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा खुलासा आठ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी आयोगाने दिले. त्यानुसार श्रीमती पाटील यांनी खुलासा सादर केला. लॉगबुक वाहनातच असते व वाहन घेऊन वाहक गॅरेजमध्ये गेलेला असल्यामुळे तपासणीसाठी तात्काळ उपलब्ध करून देता आले नाही. मात्र माहिती नाकारली नव्हती, असे श्रीमती पाटील यांनी खुलाशात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्रीमती एस.आर.पाटील यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे, तसेच तपासणी नाकारलेली नाही. वाहनाची तपासणी माहितीच्या अधिकारात अपीलकर्ता कशा प्रकारे करणार हे स्पष्ट झालेले नाही. अशी मागणी माहितीच्या अधिकारात येणार नाही. मात्र कोणत्याही नागरिकाने लॉगबुक तपासणीसाठी मागणी केल्यास ते अवलोकनासाठी उपलब्ध असले पाहिजे. तसेच माहिती-मागणी अर्जाच्या उत्तराबाबत वरिष्ठांचया वा अन्य कोणाच्या परवानगीचा प्रश्न येत नाही. जन माहिती

अधिकाऱ्यांनीच योग्य ते उत्तर द्यावयाचे आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-२, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे श्रीमती एस.आर.पाटील यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव हनुमंत पाषाणकर
रा.सी.पी.तलाव पोलीस चौकीसमोर,
जुन्या एम.आय.डी.सी.पाण्याच्या टाकीजवळ,
रामनगर नं.२८,वागळे इस्टेट,ठाणे ४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे यांचे कार्यालय,पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे यांचे कार्यालय,पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.नामदेव हनुमंत पाषाणकर
रा.सी.पी.तलाव पोलीस चौकीसमोर,
जुन्या एम.आय.डी.सी.पाण्याच्या टाकीजवळ,
रामनगर नं.२८,वागळे इस्टेट,ठाणे ४

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे यांचे कार्यालय,पुणे-१ श्री.प्रशांत शेळके

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे यांचे कार्यालय,
पुणे-१ डॉ.दीपा बापूसाहेब भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०६.०१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.०१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.०५.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत आपण मागितलेली माहिती दिलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रतींमधून समजेल अशी मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.नामदेव हनुमंत पाषाणकर यांनी केली.

श्री.पाषाणकर यांनी व्यापक स्वरुपाची माहिती मागितली होती. तसेच काही मुद्दयांमध्ये कारणांची व संभाव्य कार्यवाहीबाबतची विचारणा केली होती. त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले. तसेच माहिती संकलित करण्यासाठी विविध तालुक्यांमधून २६ संकलन रजिस्टर्स मागवून घेतली. अन्य संबंधित माहिती संकलित करुन मूळ कागदपत्रे आहेत त्या स्वरुपात छायांकित प्रतींवरुन त्यांना पुरविली. दरम्यानच्या काळात लोकसभा व विधानसभांचे कामकाज होते. तरी वेळोवेळी अपीलकर्त्यांशी चर्चा करुन माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे यांचे कार्यालय,पुणे-१ डॉ.दीपा बापूसाहेब भोसले यांनी पूरक कागदपत्रांसह केले. धरणग्रस्तांना जमीन देण्याबाबत असलेल्या तरतुदींची व मूळ अर्जात नसलेली माहितीही श्री.पाषाकर यांना देण्यात आली असून आणखी काही तपशील हवा असल्यास देण्याची तयारी, असेही डॉ.भोसले यांनी नमूद केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यांनी विशिष्ट मुद्यांबाबत नेमका तपशील हवा असल्यास जन माहिती अधिकाऱ्यांकडे स्वतंत्र अर्ज द्यावा व असा अर्ज दिल्यापासून १० दिवसांत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी पुणे यांचे कार्यालय, पुणे डॉ.दीपा बापूसाहेब भोसले यांनी त्यांना माहिती पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत गणपत अहिनवे
ओझर, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण),
पाषाण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस निरीक्षक,
ओतुर पोलिस स्टेशन, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१९४/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण),<br>पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस निरीक्षक,<br>ओतुर पोलिस स्टेशन, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.अे.बी.माळी | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे-अर्ज केल्याची तारीख | दि.०५.०१.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.०२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.०५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्याला झालेल्या मारहाणीबाबत आपण दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आपल्याला मिळाली नाही. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,

ओतुर पोलीस स्टेशन, ता.जुन्नर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण),पाषाण, पुणे यांनी ४८ तासात माहिती देणे बंधनकारक असताना १९५ दिवस अर्ज प्रलंबित ठेवला म्हणून संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करावी,अशी मागणी अपीलकर्ता श्री.चंद्रकांत गणपत अहिनवे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अर्जात दिली आहे.

श्री.अहिनवे यांनी दि.२८.०१.२००८ रोजी केलेला अर्ज दि.०२.०२.२००८ रोजी प्राप्त झाला. माहिती तयार असून शुल्क भरण्याबाबत दि.२०.०२.२००८ रोजी त्यांना कळविले. दि.१३.०५.२००८ रोजी त्यांनी शुल्क भरल्यानंतर दि.१४.०५.२००८ रोजी टपालाने माहिती पाठविली होती. श्री.अहिनवे यांनी मुळात योग्य त्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केला नव्हता. तरीही त्यांच्याकडे अर्ज पाठवून माहिती देऊ केली असता त्यांनी ती घेतली नाही. समक्ष सुनावणीस बोलावले असता ते आले नाहीत. तसेच मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहितीचे मुद्दे त्यांनी अपिलात मांडले होते. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात आणखी वेगळे मुद्दे त्यांनी मांडले आहेत. मूळ अर्जानुसार विहित मुदतीत योग्य उत्तर त्यांना देण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,ओतुर पोलीस स्टेशन, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.अे.बी.माळी व अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक (ग्रामीण), पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र लक्ष्मण लोंढे
द्वारा श्री सायकल मार्ट, लिंगाळी रोड,
बर्फ फॅक्टरीसमोर, दौंड, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज
माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०१+१०९४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र लक्ष्मण लोंढे
द्वारा श्री सायकल मार्ट, लिंगाळी रोड,
बर्फ फॅक्टरीसमोर, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.४.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपील क्र.२२०१/पुणे या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

स्वत:संबंधीच्या शाळेतील सेवेबाबतच्या विविध मुद्दयांची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे यांनी यांच्याकडे मागितली होती. परंतु या व अन्य अपिलांमधील माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे यांनी दिली नाही. संस्थेच्या सचिवांचा भ्रष्ट कारभार दडविण्यासाठी माहिती देणे टाळले जात आहे. अनेक नोंदी कागदोपत्री केलेल्या नाहीत व काही कागदपत्रे गहाळ करण्यात आलेली आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.राजेंद्र लक्ष्मण लोंढे यांनी केली. शाळेचा शिक्का असलेले व आत कोरा कागद असलेले एक पत्र दि.२६.१२.२००८ रोजी आपल्याला मिळाले, परंतु त्यावरून कोणताही खुलासा होत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

शाळेकडे असलेली सर्व माहिती श्री.लोंढे यांना दिली आहे. अनेक अर्ज व अपिले ते करीत असतात. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली असून पोहोच घेतलेली आहे. सन १९७१ ते १९७७ या काळातील संस्थेच्या दर वर्षीच्या ठरावांच्या प्रती वगैरे कागदपत्रे संस्थेच्या दप्तरी उपलब्ध नाहीत. संस्थेच्या सचिवांचे म्हणून त्यांनी नमूद केलेले पत्र सचिवांनी पाठविलेलेच नाही. या प्रकारे त्यांनी विचारणा केलेली काही कागदपत्रे बनावट व खोटी असून ती खरी ठरविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे श्री.देविदास जगदाळे यांनी लेखी निवेदनात

म्हटले आहे. शाळेकडे उपलब्ध असलेली माहिती शाळेने दिलेली आहे. अन्य विषय संस्था व अपीलकर्ता यांच्या वादाचे आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.प्रकाश परब यांनी केले.

कागदपत्रे खरी की खोटी, संस्थेत भ्रष्टाचार आहे की नाही, या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे यांचा लेखी खुलासा एका आठवड्यात सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे श्री.देविदास जगदाळे यांनी दि.१९.४.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. सुनावणीचे सूचनापत्रक विहित मुदतीत न मिळाल्यामुळे उपस्थित राहता आले नाही. तथापि श्री.लोंढे यांच्या अर्जाबाबत वेळोवेळी त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला असून विद्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांना देण्यात अलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, चं.रा.तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यामंदिर, एस.आर.पी.कॅम्प, दौंड, जि.पुणे श्री.देविदास जगदाळे यांनी खुलाशात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शामराव गोविंदराव शेंडगे
मु.पो.यवत स्टेशन, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शामराव गोविंदराव शेंडगे
मु.पो.यवत स्टेशन, ता.दौंड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे डॉ.दीपा भोसले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.५.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.१०.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांनी शुल्क किती भरावयाचे हे कळविले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांच्याकडील सुनावणीची सूचना सुनावणीनंतर मिळाल्याने उपस्थित राहता आले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शामराव गोविंदराव शेंडगे यांनी केली.

श्री.शेंडगे यांच्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांनी विहित मुदतीत उत्तर पाठविले. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही, असे कागदपत्रांवरून दिसते, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे डॉ.दीपा भोसले यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.आर.बी.उगले व श्री.एन.व्ही.शेळकंदे यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा आयोगाला सादर करावा. तसेच अपीलकर्त्यास मूळ प्रकरणातील संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन आवश्यक असलेली माहिती नि:शुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री.उगले यांनी दि.६.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला खुलासा सादर केला. तहसीलदार संजय गांधी योजना, पुणे शहर या पदावर कार्यरत असताना केवळ १५ दिवसांसाठी पुनर्वसन शाखेचा अतिरिक्त कार्यभार आपल्याकडे होता व त्यांना शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीत पत्र पाठविले. माहिती नाकारलेली नाही, असे श्री.उगले यांनी खुलाशात नमूद केले आहे. श्री.शेळकंदे

यांनी दि.२९.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला खुलासा सादर केला. श्री.शेंडगे यांचा अर्ज दि.३१.५.२००८ रोजी प्राप्त झाला व आपण दि.८.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार पुनर्वसन या पदाचा कार्यभार सोडला. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.आर.बी.उगले यांनी शुल्क भरण्याबाबतचे पत्र श्री.शेंडगे यांना पाठविल्याचे दिसते, असे श्री.शेळकंदे यांनी खुलाशात नमूद केले आहे.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार श्री.शेंडगे यांनी माहिती देण्यात आल्याचा अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे डॉ.दीपा भोसले यांनी दि.३०.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ ची माहिती उपलब्ध नसल्याचे त्यात नमूद केले आहे. माहिती मिळाल्याची श्री.शेंडगे यांची त्यावर पोहोच आहे. तथापि आपल्याला अपूर्ण माहिती मिळाल्याचे श्री.शेंडगे यांचे दिनांक नसलेले पत्र दि.७.४.२०१० रोजी आयोगाला प्राप्त झाले. माहितीत कोणती अपूर्णता आहे हे त्यात नमूद केलेले नाही. तथापि मूळ अर्जातील मुद्दा क्र.३मधील नमूद केलेल्या दि.१०.८.२००७ च्या आदेशाचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पुनर्वसन, जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांनी अपीलकर्त्यास उचित उत्तर देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. पुखराज शामाजी गादिया
रा. कामशेत, ता. मावळ, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ,
ता. मावळ, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२०७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

३. **उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
वडगाव मावळ, ता. मावळ, जि. पुणे श्री. राजेश चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.२.२००८ व २.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००८ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. पुखराज शामाजी गदिया यांची जमीन वडिवळे प्रकल्पात गेली आहे. त्याच्या नुकसान भरपाईबाबत त्यांनी अनेक अर्ज केले असून त्यावरील कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. ती त्यांना कळविण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ श्री. राजेश चव्हाण यांनी उपरोक्त कागदपत्रांसह नमूद केले.

श्री. गादिया यांचा अर्ज जिल्हाधिकारी, पुणे (पुनर्वसन शाखा) यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याचे सन २००७ पासून विविध पातळयांवरुन त्यांना कळविले गेले असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे (पुनर्वसन शाखा) पाठविण्यात आल्याचे कळविणे ही माहितीची तांत्रिक पूर्तता आहे. पुनर्वसन शाखेने त्याबाबत नेमकी कोणती कार्यवाही केली व विषयाची सद्यस्थिती काय आहे, याची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मूळ अर्जावर जिल्हाधिकारी, पुणे (पुनर्वसन शाखा) यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वडगाव मावळ, जि. पुणे यांनी प्राप्त करुन घेऊन दि. २५.५.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास पुरवावी.

पुणे
दि. 27 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदानंद महादेव गांधले
श्रीराम सोसायटी, मु. पो. ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
जि. अहमदनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
रत्नाई कृषि महाविद्यालय, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
जि. अहमदनगर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
रत्नाई कृषि महाविद्यालय, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.३.२००८ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सदानंद महादेव गांधले यांच्या मुलाने बी.एसस्सी. कृषि अभ्यासक्रमाला व्यवस्थापन कोटयातून प्रवेश घेतला होता. त्यांनी प्रवेश रद्द केला. शुल्काची रक्कम परत मिळावी, अशी त्यांची मागणी होती. विद्यालयाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात आली असूनही त्यांना गरीब होतकरु विद्यार्थ्याचा विचार करुन शुल्काची संपूर्ण रक्कम माहिती देऊन परत करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, रत्नाई कृषि महाविद्यालय, अकलूज डॉ. डी. पी. कोरटकर यांनी पूरक कागदपत्रासह केले. शुल्काची रक्कम ४२ महिने विनाकारण अडकवून ठेवली. तरीही मागणीनुसार व्याज न देता मूळ रक्कम परत केली, ही अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे

दि. 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )

राज्य माहिती आयुक्त,

पुणे खंडपीठ